3. **विज्ञान विद्याशाखेच्या** सर्व शिक्षणक्रमांची प्रात्यक्षिक परीक्षा लेखी परीक्षेपूर्वी (दि. 05 डिसेंबर 2023 ते 30 डिसेंबर 2023 या कालावधीत) अभ्यासकेंद्राने नेहमीप्रमाणे Offline पद्धतीने घ्यावयाच्या आहेत. त्यात कोणताही बदल नाही.
4. निकाल वेळेत जाहीर करण्याकरिता, दिलेल्या मुदतीत Online पद्धतीने CA & UA गुण भरलेले नसल्यास Absent Mark करून निकाल जाहीर केला जाईल. विद्यार्थ्याच्या निकालात गैरहजर आल्यास सर्वस्वी अभ्यासकेंद्र जबाबदार असेल.
5. Online पद्धतीने गुण भरण्यास काही अडचण येत असल्यास प्रथम विद्यापीठ पोर्टल (ycmou.digitaluniversity.ac) येथे Presentation मध्ये जाऊन संबंधित Presentation पाहून त्यानुसार कार्यवाही करावी.
6. सर्व अभ्यासकेंद्रांनी उपरोक्त विहित मुदतीत Internal Assessment (Theory/ Practical/Viva) पूर्ण करून, Online गुण नोंद करून Upload, Publish करणे आवश्यक राहील. दिलेल्या मुदतीत CA/UA गुणदान पूर्ण न केल्यास त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत गुण स्वीकारले जाणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.
7. **CA/UA यादीत नाव नसलेले विद्यार्थी - गुण भरणेसाठी परीशिष्ट-1**
   i) ज्या विद्यार्थ्यांचे नाव/सीटनंबर विद्यापीठाकडून उपलब्ध झालेल्या कोऱ्या गुणदान याद्यांमध्ये नसेल परंतु विद्यार्थी परीक्षेस उपस्थित असेल आणि परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरून परीक्षा देण्यास पात्र असेल अशा विद्यार्थ्यांचे गुण सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (परिशिष्ट 1 मध्ये) पाठविण्यात यावेत. त्याप्रमाणे विहित नमुन्यात आणि विहित मुदतीत प्राप्त झालेलेच गुण स्वीकारले जातील याची नोंद घ्यावी. तसेच फक्त परीक्षेकरीता परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांचेच गुण सादर करावेत.
   ii) वरील पद्धतीने गुण भरल्यानंतर ती यादी सही व शिक्क्यानिशी सीलबंद करून परीक्षा कक्षाकडे माहितीसाठी पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. तसे परीक्षा कक्ष-३ च्या ईमेलवरदेखील कळवावे. **(unit3@ycmou.digitaluniversity.ac)**
8. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांचे जा.क्र.वि.से.वि/2023/206, दि. 04.10.2023 रोजीच्या पत्रानुसार अभ्यासकेंद्राने शिक्षणक्रमनिहाय उपस्थितीपत्रक ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी संपर्कसत्राच्या वेळी उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीपत्रकावर सह्या घेण्यात याव्यात. **UGC च्या निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती 75% पेक्षा कमी राहील अशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही, याबाबत अभ्यासकेंद्राने विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती 75% पेक्षा जास्त असेल, अशाच विद्यार्थ्यांचे गृहपाठ स्वीकारण्यात यावेत व त्यांचे मूल्यमापन करून ते गुण ONLINE पद्धतीने सादर करावेत.** याबाबतची सर्व जबाबदारी ही अभ्यासकेंद्राची राहील.

परीक्षा कक्ष -3 मधील शिक्षणक्रमांसाठी विद्यापीठाच्या प्रचलित कार्यपद्धतीनेच CA गुणांची कार्यवाही करावी. याची नोंद घ्यावी .

परीक्षा नियंत्रक

प्रती : **सर्व विभागीय केंद्रे** — यचममुवि - कृपया आपल्या अधिनस्त सर्व अभ्यासकेंद्रांना E-mail, WhatsApp Group, टपालाने या सूचना कळवाव्यात.

1) संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा
2) संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
3) प्रमुख, संगणक केंद्र (परीक्षा)
4) मा. परीक्षा नियंत्रक कार्यालय - वेबसाईटवर प्रसिद्धीसाठी
5) प्रमुख, एमकेसीएल



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गुणयाद्या पाठविण्याचा नमुना

CA / UA / Practical marks for the examination for January 2024 (Winter Exam)

Name of Study Center:

Study Center Code :

Name of Program :

Pattern of Program :

Name of Subject :

Code of Subject :

Sr. No.	Seat No.	PRN	Name of Student	CA Out of	UA Out of

Study Centre's Explanation:

Sign of Internal Examiner
(Name)

Sign of External Examiner
(Name)

Seal of study centre